# स्त्रियांच्या वेषांतील परिवर्तनाचा हस्तवेम-उत्पादित[१] वस्त्राच्या अभियाचनावरील[२] परिणाम

सुलभा ब्रह्मे

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत हिंदुस्थानांतील सर्व वस्त्र-प्रदाय[३] स्वदेशी हातमागांकडून होत असे. परंतु ब्रिटिश आमदानीच्या आरंभापासून परदेशी निर्माणी[४]-उत्पादित कापडाची आयात हिंदुस्थानांत सुरू झाली; आणि सन १८५० नंतरच्या पंचवीस वर्षांत ही आयात फार झपाट्यानें वाढत गेली. परदेशी कापडाच्या आयातीचा परिणाम मध्यम प्रतीच्या हातमागाच्या कापडांवर प्रामुख्यानें झाला. अगदीं उच्च प्रतीच्या रेशमी व जरतारी उत्पादांवर[५] अथवा हिंदी पद्धतीच्या लुगडीं पागोटी अशा विशिष्ट उत्पादांवर परदेशी उत्पादांचें प्रत्यक्ष आक्रमण होणें शक्य नव्हतें. तसेंच खेडेगांवांत वापरलें जाणारें जाडेंभरडें पण अत्यंत टिकाऊ असें कापडहि परदेशांतून येत नसे. परंतु सन १८९५ नंतर हिंदुस्थानांत कापडाच्या बऱ्याच निर्माणी निघाल्या, आणि पहिल्या महायुद्धानंतर त्या विशेष भरभराटीस आल्या. या निर्माणींमध्यें तयार झालेल्या कापडाचा प्रसार खेड्यांतहि होऊं लागल्यानें हातमागाच्या कनिष्ठ प्रतीच्या कापडाचा विक्रय कमी झाला. सारांश, प्रथम परदेशी कापड व पुढें स्वदेशी निर्माणी-उत्पादित कापड यांच्या स्पर्धेस तोंड द्यावें लागल्यामुळें हातमागाच्या कापडाचें स्थान केवळ लुगडीं, खण इत्यादि विशिष्ट हिंदी पद्धतीच्या उत्पादनांतच टिकून राहिलें.* यामुळें पुरुषांच्या वस्त्रांच्या बाबतींत हातमाग कापडाचें क्षेत्र फारच संकुचित झालें; परंतु स्त्रियांच्या वेषांत मात्र त्यांचें स्थान बऱ्याच अंशीं अबाधित राहिलें. स्त्रियांच्या वेषांत हातमाग व निर्माणी-उत्पादित कापडाचें सध्यां काय स्थान आहे, विविध हातमाग कापडाच्या उत्पादन केंद्रांच्या उत्पादांचा कसकसा उपयोग केला जातो, व भविष्यकालांत त्यांत काय बदल होण्याची शक्यता आहे याचें विवेचन प्रस्तुत लेखांत केलें आहे. हातमाग उद्योगाचें हिंदी अर्थव्यवस्थेंतील महत्त्व लक्षांत घेतां, पुढील विवेचन उद्‌बोधक होईल असें वाटतें.

पुढील विवेचन सन १९५५ सालीं पुणें शहरांतील कापडाच्या अभियाचनासंबंधींच्या अधीक्षणांत[६] संगृहीत केलेल्या माहितीवर आधारिलें आहे. या अधीक्षणांत ५४५ न्यादर्श[७] कुटुंबांचा समावेश केला होता. न्यादर्श कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीसाठीं एका वर्षाच्या अवधींत वस्त्रक्रयावर[८] झालेला व्यय[९] विचारिला होता. याशिवाय कापडाची मात्रा[१०], गुण, उत्पादक इत्यादि माहिती विचारिली होती. अधीक्षित ५४५ कुटुंबांत एकूण १२ वर्षे वयावरील ८२७ स्त्रिया होत्या. त्यांतील २०१ स्त्रिया गुजराती, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन इत्यादि होत्या. या स्त्रियांचा वेष महाराष्ट्रीय

१. हस्तवेम – handloom
२. अभियाचन – demand
३. वस्त्र-प्रदाय – supply of cloth
४. निर्माणी – mill
५. उत्पाद – product
६. अधीक्षण – survey
७. न्यादर्श – sample
८. वस्त्रक्रय – purchase of cloth
९. व्यय – expenditure
१०. मात्रा – quantity

* गाडगीळ ध. रा., हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास, (१९३२), पृष्ठ २७.